# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर
( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )
विद्यानगर, राजाराम कॉलेज जवळ, कोल्हापूर , पिन कोड- ४१६००४
फोननंबर-(०२३१)–२५२१०३८ वेबसाइट- www.gpkolhapur.org.in


जा.क्र. शातंनिको/परीक्षा विभाग /२०२२/94 दि. ५ एप्रिल २०२२

**महत्त्वाचे परीपत्रक :-**

**विषय: उन्हाळी परीक्षा २०२२ च्या आयोजनाबाबत..**

संदर्भ:-जा. क्र. मरातशिम/का-४० (परीक्षा विभाग)/F१/२०२२/०५३ दिनांक-4 APR 2022

शासकीय तंत्र निकेतन कोल्हापूर या संस्थेच्या सर्व अभ्यासक्रमाकरीता उन्हाळी परीक्षा - २०२२ ची रुपरेषा व कार्यपद्धती महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या विद्वत समितीच्या शिफारस व मान्यतेने सर्व विद्यार्थी व त्यांचे पालकाना माहिती व कार्यवाहीसाठी खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१. शासकीय तंत्र निकेतन कोल्हापूर या संस्थेच्या सर्व अभ्यासक्रमाकरीता सम सत्रातील विद्यार्थ्यांची उन्हाळी परीक्षा -२०२२ पासून प्रात्यक्षिक परीक्षा व लेखी परीक्षा संस्थेच्या प्रचलित - पद्धतीने लागू असलेल्या Teaching Examination Scheme, मंडळाच्या परीक्षाविषयक नियमावलीतील तरतूद व Manual for conduct of Examination, Assessment Process & Post Result Activities मधील मार्गदर्शक तत्त्वानुसार घेण्यात येणार आहेत.

२. विद्यार्थी हितास्तव केवळ उन्हाळी २०२२ परीक्षेकरीता Teaching Examination Scheme नुसार निर्धारीत केलेल्या फक्त लेखी परीक्षेच्या कालावधीत प्रत्येक तासाच्या कालावधीकरीता अतिरीक्त १० मिनिटे वेळ देण्यात येईल. उदा. Teaching Examination Scheme नुसार लेखी परीक्षेसाठी ३ तासांचा कालावधी निर्धारीत केला असेल अशा लेखी परीक्षेस ३० मिनिटे अतिरीक्त वेळ देण्यात येईल.

३. कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेली अपवादात्मक परिस्थितीत प्रात्यक्षिक व Multiple Choice Question (MCQ) नुसार ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेच्या आयोजनाकरीता संस्थेने निर्गमित केलेले परीपत्रक अथवा आदेश हे उन्हाळी परीक्षा २०२२ पासून लागू राहणार नसून अ.क्र. १ मध्ये नमूद केले नुसार परिक्षा ऑफ लाईन पद्धतीनेच घेण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी.

सम सत्र उन्हाळी परीक्षा २०२२ करीता वरील सर्व बाबी विद्यार्थी व त्यांचे पालक यांना अवगत करून देण्यात येत आहे. याची नोंद घ्यावी.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर ,

प्रत:- १)सर्व नोटीस बोर्डवर जाहीर
२)सर्व विभागाना जाहीर करणेसाठी ३) वेबसाईटवर प्रदर्शित करणेसाठी

D: rawexam/summer22/